**क्रमांक : २२८६/ग-१.**
महाराष्ट्र विधानमंडळ सचिवालय.
विधान भवन, मुंबई,
दिनांक : **28 NOV 2024**

**:: प रि प त्र क ::**

या सचिवालयातील अधिकारी / कर्मचारी यांना कळविण्यात येते की, महाराष्ट्र विधानमंडळाचे आगामी हिवाळी अधिवेशन विधान भवन, नागपूर येथे प्रस्तावित आहे.

नागपूर येथे अधिवेशनाच्या कामासाठी येणाऱ्या या सचिवालयातील गट-अ, गट-ब, गट-क व गट-ड मधील अधिकारी/कर्मचाऱ्यांची निवास व्यवस्था नेहमीप्रमाणे नवीन इमारत व १६०/२ खोल्यांचे गाळे येथे करण्यात येईल. पुरेशा जागेअभावी **एका खोलीत गट-अ मधील ४ अधिकारी, गट-ब, गट-क व गट-ड मधील ५ अधिकारी/कर्मचारी असतील.** त्याअनुषंगाने एका खोलीत गटाने राहू इच्छिणाऱ्या अधिकारी/कर्मचारी यांनी वर नमूद केलेल्या संख्येनुसार आपल्या **गटातील नावे एकत्रित स्वरूपात स्वाक्षरीसह यासोबत उपलब्ध करुन दिलेल्या नमुन्यात गुरुवार, दिनांक ५ डिसेंबर, २०२४ रोजी सायंकाळी ५.०० वाजेपर्यन्त** 'ग-१' कक्षाकडे कळवावीत. तथापि, त्यांची विशिष्ट गटामध्ये राहण्याची व्यवस्था होईलच याची हमी देता येणार नाही. एखाद्या खोलीमध्ये त्यांच्या पसंतीनुसार गट पूर्ण होत नसल्यास त्या खोलीतील रिक्त जागी दुसरा कोणताही अधिकारी/कर्मचारी देण्यात येईल. तसेच नागपूर येथील अधिवेशन कालावधीत जे अधिकारी/कर्मचारी नातेवाईकांकडे राहू इच्छितात त्यांनी आपली नावे कळवू नये. ज्या खोलीमध्ये ज्या अधिकारी / कर्मचाऱ्यांची नावे गाळे वाटप विवरणपत्रात दर्शविली आहेत त्यांनी त्याच ठिकाणी राहणे आवश्यक आहे. **एखादा कर्मचारी नागपूर येथे अधिवेशनाच्या कामाकरीता येणार नसतानाही त्याने खोलीसाठी नाव दिल्यास अथवा खोलीचे वाटप करण्यात आल्यानंतर संबंधित कर्मचारी तेथे राहत नसल्याचे निदर्शनास आल्यास त्यांच्याविरूध्द शिस्तभंगाची कारवाई करण्यात येईल याची नोंद घ्यावी.**

मा.पीठासीन अधिकारी / उप पीठासीन अधिकारी व मा.विरोधी पक्षनेते, महाराष्ट्र विधानपरिषद यांच्या आस्थापनेवरील सर्व कर्मचाऱ्यांची राहण्याची सोय मा.पीठासीन अधिकारी / उप पीठासीन अधिकारी व मा.विरोधी पक्षनेता, महाराष्ट्र विधानपरिषद यांच्या निवासस्थानाजवळील रविभवन येथे स्वीय सहाय्यकांसाठी असलेल्या निवासस्थानांमध्ये करण्यात येईल.

( विजय कोमटवार )
अवर सचिव
महाराष्ट्र विधानमंडळ सचिवालय

प्रति :

(१) महाराष्ट्र विधानमंडळ सचिवालयाचे सर्व अधिकारी व कर्मचारी.
(२) मा.अध्यक्ष, महाराष्ट्र विधानसभा यांचे सचिव.
(३) मा.उप सभापती महाराष्ट्र विधानपरिषद, मा.विरोधी पक्षनेते विधानपरिषद यांचे खाजगी सचिव तथा जनसंपर्क अधिकारी.
(४) मुख्य सुरक्षा अधिकारी, महाराष्ट्र विधानमंडळ सचिवालय.
(५) सचिव-१ (कार्यभार), महाराष्ट्र विधानमंडळ सचिवालय यांचे स्वीय सहाय्यक.
(६) सचिव-२ (कार्यभार), महाराष्ट्र विधानमंडळ सचिवालय यांचे स्वीय सहाय्यक.
(७) कक्ष अधिकारी तथा आहरण व संवितरण अधिकारी, महाराष्ट्र विधानमंडळ सचिवालय.
(८) कक्ष अधिकारी तथा मालमत्ता व्यवस्थापक, महाराष्ट्र विधानमंडळ सचिवालय.

म.वि.स./ग-१

दिनांक :

# हिवाळी अधिवेशन, २०२४

नागपूर येथील १६०/२ खोल्यांचे गाळे तसेच,
नवीन इमारत येथील जागा वाटपासंदर्भात
भरून द्यावयाचे विवरण

बॅरेक क्रमांक :

ब्लॉक क्रमांक :

| अ.क्र. | अधिकारी व कर्मचाऱ्याचे नाव | पद | कक्ष | स्वाक्षरी |
|---|---|---|---|---|
| (१) | श्री./श्रीमती | | | |
| (२) | श्री./श्रीमती | | | |
| (३) | श्री./श्रीमती | | | |
| (४) | श्री./श्रीमती | | | |
| (५) | श्री./श्रीमती | | | |